**आदिवासी क्षेत्र उपयोजना** / आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या **"राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम "** या उपशिर्षाखालील सन २०१७-१८ चे प्राप्त केंद्रीय सहाय्य वितरीत करण्याबाबत.
**( लेखाशिर्ष क्रमांक- २२१५ ९८५३ ).**

**महाराष्ट्र शासन.**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र. क्र. ०६ / कार्यासन.६.**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - १८ ऑक्टोबर, २०१७.

<u>वाचा -</u>

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.
४) केंद्र शासनाचे पत्र क्र.G-११०११/२/२०१७-Water-I /३२, दिनांक १९-०५-२०१७.
५) केंद्र शासनाचे पत्र क्र. W-११०२०/१९७/२०१५- Water-I /५२, दिनांक ०९-०८-२०१७.
६) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची नस्ती क्र.राग्रापे- २०१७ / प्र.क्र. ११९ /पापु.-१०.

**शासन निर्णय-**

आदिवासी उपयोजनांतर्गत मागणी क्र.टी-५, २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१- पाणी पुरवठा , ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना (०१) (०९) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम ( केंद्रीय हिस्सा) २२१५ ९८५३ मधील ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली सन २०१६-१७ या वर्षात रु. १३०००.०० लाख़ निधी अर्थसंकल्पित आहे.

केंद्र शासनाने आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या योजनेंकरिता त्यांच्या वाचा क्र. ४ व ५ येथील पत्रान्वये Sustainability साठी रु. ६८३.१९ लाख आणि रु.१२३८.४४ लाख असा एकुण रु. १९२१.६३ लाख इतका वितरीत केलेला आहे. त्यानुषंगाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने प्रस्तावित केल्यानुसार (०१) (०९) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम ( केंद्रीय हिस्सा) (२२१५ ९८५३ ) ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर ) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षात अर्थसंकल्पित रु.१३०००.०० लक्ष निधीतून रु. १९२१.६३ लाख (रुपये एकोणीस कोटी एकवीस लाख त्रेसष्ट हजार फक्त ) इतका निधी या योजनेचे नियंत्रक अधिकारी, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना खर्चासाठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास याद्वारे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची

दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. ४०९/ अर्थोपाय, दि.२२-०९-२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१७१४३०१८२७२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2017.10.18 16:06:14 +05'30'

( रविंद्र दि. औटे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.
४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.
७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
०९. वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (पापु-१०) मंत्रालय, मुंबई
११. अवर सचिव, कार्यासन-१४, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. कार्यासन अधिकारी, कार्यासन- २, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.